वाचलेः-१) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त, यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय,वाकड यांच्याकडील क्र.३८/२३ दि.१०/०२/२०२३ चे पत्र
४) दि.२०/०३/२०२३ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिक
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/135/२०२३
दि.२०/०३/२०२३

विषय –नियत वयोमानानूसार सेवानिवृत्तीबाबत.
श्री.उनवणे अशोक विष्णू "मुख्याध्यापक" सं.क्र. ५९३४

आदेश,

श्री.उनवणे अशोक विष्णू "मुख्याध्यापक" हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षक या पदावर दि.०५/०३/१९८४ रोजी माध्यमिक शिक्षण विभागात रूजू झालेले आहेत. श्री.उनवणे अशोक विष्णू "मुख्याध्यापक" यांच्या मुळ सेवानोंद पुस्तकानुसार त्यांची जन्म तारीख दि.२६/०४/१९६५ अशी असून त्यांच्या वयास दिनांक - २५/०४/२०२३ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.उनवणे अशोक विष्णू "मुख्याध्यापक" यांना दि.३०/०४/२०२३ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील, त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.उनवणे अशोक विष्णू "मुख्याध्यापक" यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच श्री.उनवणे अशोक विष्णू "मुख्याध्यापक" यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणीकर्ज,वाहनकर्ज,संगणक कर्ज,घरदूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण व माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी सोसायटी कर्ज तसेच इतर कोणतेही येणे बाकी नाही असे विद्यालयाने कळविलेले आहे.तसेच श्री.उनवणे अशोक विष्णू मुख्याध्यापक यांच्या सेवानोंद पुस्तकाची तपासणी केली असता त्यांना सेवासातत्य दिलेचे दिसुन येत नाही.

सबब,मी उप आयुक्त,माध्यमिक शिक्षण विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन )नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.उनवणे अशोक विष्णू "मुख्याध्यापक" यांना दिनांक - ३०/०४/२०२३ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्री.उनवणे अशोक विष्णू "मुख्याध्यापक" यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(संदिप खोत)
उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्री.उनवणे अशोक विष्णू "मुख्याध्यापक"
माध्यमिक विद्यालय वाकड

प्रतः-  १) लेखा शाखा

२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग

३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. ४

४) माध्यमिक विद्यालय वाकड

२/- पुढील कार्यवाहीसाठी

(रोहिणी शिंदे)
प्रशासन अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.